# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषि नगर, अकोला
## कृषि नगर, अकोला - ४४४ १०४

**संदर्भ** - विद्यापीठ जाहिरात क्र. पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१२, दि. २४ मार्च २०१२

# सुचना

**क्र.पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१२** **दिनांक 12 फेब्रुवारी, २०१५**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठातील चौकीदार पदे भरण्यासाठी दि. १० फेब्रुवारी २०१५ रोजी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेत प्राप्त गुण आणि शाररिक क्षमता चाचणीतील गुण यांची **"एकत्रित गुणवत्ता यादी "** दिनांक १२.२.२०१५ रोजी विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या आधारे, जाहीरातीमधील पदसंख्येच्या अनुषंगाने **"बोलाविण्यांत येणा-या उमेदवारांचे नावांची प्रवर्गनिहाय यादी "** सुध्दा विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आली आहे. यासाठी स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही. संबंधीत उमेदवारांनी वरील यादी संकेतस्थळावर पाहून त्यांचे कागदपत्रांचे पडताळणीसाठी खालील तक्त्यामध्ये नमुद केल्या प्रमाणे हजर राहणे आवश्यक आहे.

| पदाचे नांव | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| चौकीदार | १८.२.२०१५ | सकाळी १०.०० | स्व.डॉ. के.आर. ठाकरेसभागृह, कृषि महाविद्यालय, कृषिनगर अकोला |

उपरोक्त नुसार संबंधीत उमेदवारांनी लेखी परिक्षचे प्रवेशपत्र व ओळखपत्र तसेच एमकेसीएल यांनी पुरविलेल्या पीडीएफ अर्जाची प्रत आणि त्यासोबत जाहिरातीचे अनुषंगाने अर्जासोबत सादर केलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती व छायांकीत प्रतींचा एक संच सोबत आणावा. उमेदवारांनी कागदपत्रांच्या छाननीसाठी बोलाविण्यात आलेल्या नियोजीत दिवशी वेळेवर उपस्थित रहावे. जे उमेदवार नियोजीत वेळ व दिनांकास उपस्थित होणार नाही अथवा जे उमेदवार नमुद केलेली कागदपत्रे पुरविण्यास असमर्थ ठरतील अशांची उमेदवारी ग्राहय धरण्यात येणार नाही तसेच नंतर त्याविषयी कुठल्याही प्रकारची तक्रार/विनंती मान्य करण्यात येणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

केवळ कागदपत्र छाननीसाठी बोलाविण्यात आले म्हणून उमेदवारांनी निवड झाली असे समजण्यात येवू नये. छाननी नंतर जाहिरात केलेल्या प्रवर्गानूसार पात्र ठरलेल्या गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड मुलाखती शिवाय करण्यात येणार आहे.

कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला